FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

0154132

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि, मुंबई, पहिली खबर क्र. २४, वर्ष २०२१, दिनाक २५/०५/२०२१
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
(iii) इतर अधिनियम व कलने Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार ..., तारीख पासून १२/०५/२०२१, वेळ ..., तारीख पर्यंत २४/०५/२०२१, वेळ ...
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २४/०५/२०२१, वेळ १५:३०
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोद क्र. ०६/२१, तारीख २५/०५/२१ वेळ ०६:१५
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी तक्रार सर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे) दुग्ध वसाहत, गोरेगाव (पुर्व), मुंबई-४०००६५ Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव यांचे कार्यालय, ठिकाणाचे नंबर ..., गल्ली ..., रस्त्याचे नाव ...
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव आनंद माने (b) वडिलांचे / पतीचे नाव भिमराव माने
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ०६/०५/१९७५ (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९९२०३१५२५५
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ..., दिल्याचा दिनांक ..., दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय शिवणकाम
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदु, जात Caste महार, जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता पंचशील रहिवासी सेवा संघ, आरे मिल्क कॉलनी, युनिट न ३२, गोरेगाव (पुर्व), गल्ली / सर्व्हे नं. ... घर / नाव नं. ... फोन / मो. नं. ... पॅन नं. ... वोटर्स नं. ...
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव मुंबई-४०००६५, जवळचे प्रसिद्ध ठिकाण आरे पोलीस ठाणे, गाव ..., पोस्ट ..., पो. स्टे. ...
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ..., जिल्हा ..., राज्य ..., सध्याचा पत्ता ...
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

१) आलोसे श्री नथु विठ्ठल राठोड, वय ४४ वर्षे, धंदा-नोकरी (मुख्य कार्यकारी अधिकारी), आरे दुग्ध वसाहत गोरेगाव (पुर्व), मुंबई-४०००६५, रा. ठि. न्युझिलंड हॉस्टेल, आरे कॉलनी, गोरेगाव (पु), मुंबई-४०००६५ सीईओ बंगला

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

२) आलोसे श्री. अरविंद त्रिभुवन तिवारी, वय ५७ वर्षे, धंदा-नोकरी (शिपाई), आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पुर्व) मुंबई-४०००६५, रा. ठि. युनिट न २८, आरे मिल्क कॉलनी, कृष्णा किराणा स्टोर्स जवळ, आरे कॉलनी गोरेगाव पुर्व, मुंबई-४०००६५.

यातील फिर्यादी श्री. आनंद भिमराव माने, श. हि. पंचशील रहिवासी सेवा संघ, आरे मिल्क कॉलनी, युनिट नं ३२, गोरेगाव पुर्व, मुंबई-४०००६५ यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सुप्रिया नटे)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई

फिर्यादी दिनांक २४/०५/२०२१

श्री. आनंद भिमराव माने , वय ४७ वर्षे, धंदा– शिवणकाम, रा.ठि. पंचशिल रहिवाशी सेवा संघ, आरे कॉलीनी, युनिट नं. ३२, गोरेगांव (पूर्व) , मुंबई–४०००६५, मो.क्र. ९९२०३१५२५५

..........

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी माझ्या जन्मापासून रहावयास आहे. सदर ठिकाणी मी माझे कुटुंबियासह रहावायास आहे. माझे वडील श्री. भिमराव माने हे आरे दुग्धालय विभागातील सुरक्षा विभागात नोकरीस होते. ते वीस–बावीस वर्षापूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत. मी सध्या राहत असलेले घर माझे वडीलांचे मालकीचे आहे. मी लहान मुलांचे कपडे शिवण्याचे काम करतो व त्यावर माझे कुटुंबाचे उदरनिर्वाह करतो.

आम्ही राहत असलेली पंचशिल रहिवाशी सेवा संघ, आरे कॉलीनी, युनिट नं. ३२, गोरेगांव (पूर्व) , मुंबई–४०००६५ ही खोली माझे वडीलांनी माझे जन्मापूर्वीच घेतली आहे. सदर खोलीची बरेच वर्षापासून दुरूस्ती केली नाही. त्यामुळे पावसाळयापुर्वी सदर खोलीची दुरूस्ती करणे आवश्यक होते. सदर खोलीचे दुरूस्ती करावयाची असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत , गोरेगांव (पूर्व), मुंबई–६५ यांची परवानगी घेणे आवश्यक असल्याने मी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव, मुंबई यांचे नावाने दिनांक १२/०५/२०२१ रोजी लेखी विनंती अर्ज तयार करून मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्धालय वसाहत, गोरंगाव मुंबई यांना देण्याकरीता त्यांचे कार्यालयात गेलो.

नमुद कार्यालयातील अर्ज स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्याने माझा घर दुरूस्ती संदर्भातील अर्ज स्वीकारला नाही व घर दुरूस्तीचा अर्ज घेण्यास मनाई असून सदरचा अर्ज घेवून थेट सी.ई.ओ. साहेबांना भेटा असे मला सांगितले. त्याप्रमाणे मी तेथील सी.ई.ओ. साहेब श्री. नथु राठोड यांचे कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेवून, मी राहत असलेल्या घराची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने परवानगी देण्याबाबत विनंती केली. त्यावेळी त्यांनी मला त्यांच्या कार्यालयातील शिपाई श्री. तिवारी यास भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्याचे कार्यालयाबाहेरील शिपाई श्री. तिवारी यांना भेटलो व राठोड साहेबांनी त्यांना भेटावयास सांगितले असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. तिवारी हे श्री. राठोड साहेबांच्या केबिनमध्ये गेले व थोड्या वेळातच ते परत माझेकडे आले व त्यांनी माझेकडे आता किती पैसे आहेत याची विचारणा केली. त्यावेळी माझेकडे आता पैसे नसल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी घर दुरूस्ती करावयाची असेल तर पन्नास हजार रूपये साहेबांना द्यावे लागतील असे तिवारी यांनी मला सांगितले. तेव्हा मी श्री. तिवारी यांना सद्या माझेकडे इतके पैसे नाहीत, सोमवारी सांगतो असे सांगितले व घरी निघुन गेलो.

मला सी.ई.ओ. श्री. नथु राठोड व तिवारी यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दिनांक १४/०५/२०२१ रोजी १५.३० वाजताचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्याकरीता आलो. तेथे आल्यानंतर माझी तक्रार तेथील वरिष्ठांना सांगितली व वरिष्ठांनी पो.नि. सुप्रिया नटे यांना बोलावून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे या मला घेवुन त्याचे केबिनमध्ये गेल्या. पो.नि. नटे यांनी त्यांचे केबिनमध्ये उपस्थित असलेल्या एका महिलेची ओळख सहाय्यक पोलीस आयुक्त, श्रीमती देशमुख अशी मला करून दिली व त्या माझे तक्रारीचे कारवाई दरम्यान

दिनांक २४/०५/२०२१ रोजीचा फिर्यादी श्री. आनंद भिमराव माने यांचा जबाब पुढे चालु

देखरेख अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे सांगितले. पो.नि. नटे यांनी माझे तक्रारीबाबत विचारपुस करून मला माझी तक्रार लेखी देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे हस्ताक्षरात मला सीईओ व तिवारी यांनी रू. ५०,०००/- लाच मागितली असून त्यावर कारवाई होणेकरिता लेखी तक्रार अर्ज पो.नि. सुप्रिया नटे यांचेकडे दिला. सीईओ नथु राठोड यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोहचणे शक्य नसल्याने सीइओ राठोड यांची भेट होणे शक्य नसल्याचे मी पो.नि.नटे यांना सांगितले नमुद दिवशी माझे तक्रारीची पडताळणी कारवाई करण्यात आली नाही.

सी.ई.ओ. श्री. नथु राठोड हे मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे), आरे दुग्ध वसाहत ,गोरगांव पूर्व, मुंबई व आयुक्त कार्यालय, दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई येथे उप आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास (प्रशासन) म्हणून अतिरिक्त काम पहातात. त्यामुळे ते आरे, गोरेगाव तसेच वरळी दुध डेअरी या दोन्ही कार्यालयात येवून त्यांचे अधिनस्त कामकाज पाहतात. दिनांक १९/०५/२०२१ रोजी ते आयुक्त कार्यालय, दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयामध्ये भेटणार असल्यामुळे मी, माझे मित्र श्री. राजकिरण साळवे यांचेसोबत दिनांक १९/०५/२०२१ रोजी १३.४५ वाजता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे आलो. त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील आवश्यक कामकाज पुर्ण करण्यात येवून माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरिता मला पंचांसह लोकसेवकाचे कार्यालयात पाठविण्यात आले. मी, माझे मित्र श्री. साळवे, पंच श्री. भायदे असे सी. ई. ओ. श्री. राठोड यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात गेलो. आम्ही राठोड यांचे कार्यालयात पोहचलो त्यावेळी राठोड हे मिटींगमध्ये असल्यामुळे आम्ही त्यांचे कक्षाबाहेरील जागेत त्यांची वाट पहात थांबून राहिलो. काही वेळाने राठोड त्यांच्या केबीनमध्ये आल्यानंतर प्रथम माझे मित्र श्री. राजकिरण साळवे हे राठोड यांना भेटण्यास गेले. त्यानंतर काही वेळाने श्री साळवे हे राठोड साहेबांच्या केबीनमधून बाहेर आले व मला राठोड साहेबांचे केबिनमध्ये घेवून गेले. मी राठोड साहेबांना माझ्या वर नमुद पत्यावरील घराचे दुरूस्तीबाबत परवानगी हवी असल्याचे सांगितले. तसेच दिनांक १२/०५/२०२१ रोजी त्यांचे सांगण्याप्रमाणे श्री. तिवारी यांना भेटलो असता त्यांनी रू. ५००००/- मागितले. इतकी रक्कम मला देणे शक्य नसून त्यात काही कमी करण्याबाबत श्री. नथू राठोड यांना विनंती केली. त्यावेळी सी.ई.ओ श्री. नथू राठोड यांनी **'तुमाला जसं जमतं तसं करुन घ्या...तुमाला जे शक्य होतं, ठिकये तुमाला काय करायचं ते तिवारीकडुन करुन घ्या'** असे सांगितले. तेव्हा मी साहेबांन माझा अर्ज देखील न घेतल्याबाबत सांगितले.

मला दिनांक १९/०५/२०२१ रोजी नथु राठोड यांनी तिवारी यांना भेटण्यास सांगितल्याप्रमाणे मी दिनांक २१/०५/२०२१ रोजी सी.ई.ओ श्री. नथू राठोड साहेब आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव या कार्यालयात असल्याने तिवारी यांना भेटावयास जाणेकरिता सकाळी १०.४५ वाजताचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे आलो. नमुद दिवशी पडताळणी कारवाईकरीता मी, पंच व पोलीस पथक असे गोरेगांव पूर्व येथे रवाना झालो. आम्ही गोरेगाव पश्चिम द्रुतगती महामार्ग येथे पोहचलो असता माझे मित्र श्री. राजकिरण साळवे यांनी सी.ई.ओ श्री. नथू राठोड साहेब हे कार्यालयात येणार नसून सोमवार दिनांक २४/०५/२०२१ रोजी येणार असल्याचे अंदाजे १३.३० वाजता माझे मोबाईलवर फोन करून सांगितले. सदरची माहिती पो.नि. सुप्रिया नटे यांना दिली असता सदरची पडताळणी रद्द करण्यात येवून पुढील कारवाई सोमवार दिनांक २४/०५/२०२१ रोजी करण्याचे ठरले.

24-5-2021



समक्ष

(सुप्रिया किरण नटे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

दिनांक २४/०५/२०२१ रोजीचा फिर्यादी श्री. आनंद भिमराव माने यांचा जबाब पुढे चालु

मला दिनांक २१/०५/२०२१ रोजी पो.नि. नटे यांनी दिलंल्या सुचनेप्रमाणे मी आज दिनांक २४/०५/२०२१ रोजी सकाळी १०.१५ वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयात आलो. लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आवश्यक कारवाई पुर्ण करून माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरिता मी, पंच व पोलीस पथक असे दोन पोलीस वाहनातून राठोड साहेबांचे आरे, गोरेगाव, मुंबई या कार्यालयात जाणेकरिता रवाना झालो. आम्ही राजीव गांधी सी लिंकवरून पुढे पश्चिम द्रुतगती मार्गावरून जात असताना पो.नि. नटे यांनी दुसरे वाहनातील पथकान पश्चिम द्रुतगती मार्गावर गोरेगाव येथे थांबण्यास सांगितले व मी, पंच, पो.नि. नटे , सपोआ देशमुख, पो.शि. सोनोने , मपोशि शिला शिगवण असे आरे कॉलनी रोडने कल्यान केंद्र हॉल, युनिट–५ आरे कॉलनी, गोरेगांव पूर्व, मुंबई येथे आल्यावर पो.नि. नटे यांचे सांगण्यावरून वाहन चालकाने वाहन कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने उभे करून ठेवले.

त्यानंतर पोनि श्रीमती सुप्रिया नटे यांनी मला व पंच श्री. भायदे यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाचे दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल रेकॉर्डर चालू करून पोलीस अंमलदार सोनोने यांच्या मदतीने माझे शर्टाचे आतील बनियनला लावले. सदर ठिकाणाहून मी व पंच श्री. भायदे पडताळणीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे) कार्यालय, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव, मुंबई येथे गेलो. सदर ठिकाणी श्री. तिवारी यांना भेटलो व त्यांना मी सीईओ नथु राठोड साहेबांची माझे घर दुरूस्तीकरीता वरळी कार्यालयात जावून भेट घेतल्याचे सांगून राठोड साहेबांनी मला तिवारींनाच भेटा असे सांगितले. नमुद वेळी मी तिवारींकडे त्यांनी सांगितल्या प्रमाणे घर दुरूस्ती करीता द्यायच्या पंन्नास हजारामध्ये श्री. राठोड साहेबांनी काही कमी केले किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावेळी श्री. तिवारी यांनी मला **'' ओ देखो अभी उसका फायदा मे बोला है, तो उससे उपरही लेता है ''** असे म्हणून पन्नास हजारच द्यावे लागतील कमी होणार नाही असे सांगून सदरचे पैसे दिड वाजेपर्यत घेवून येण्यास सांगितले. त्यावेळी मी पैशांची व्यवस्था केलीय पैसे घेवून येते असे म्हणून सदर ठिकाणाहून पायी चालत पंचांसह पोलीस वाहनाजवळ निघून आलो.

त्यानंतर पो.शि. सोनोने यांनी माझे बनियनच्या आतमध्ये अडकविलेला व्हॉईस रेकॉर्डर काढून तो पोनि सुप्रिया नटे यांचेकडे दिला. त्यांनी तो बंद करून स्वतःकडे ठेवला व पडताळणीच्या वेळी झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक श्री. तिवारी याने पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. नथु राठोड यांचे वतीने रू. ५०,०००/– इतके लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने व लोकसेवक तिवारी यांनी लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि सुप्रिया नटे यांनी सांगितले व मी लाच देण्याकरिता रक्कम सोबत आणली आहे कींवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी लाचेकरीता लागणारी रक्कम मी, माझे मित्र श्री. राजकिरण साळवे यांचेकडून रूपये तीस हजार व माझे बचतीतील रूपये वीस हजार असे एकुण रक्कम रू. ५००००/– (रू. २०००/– दराच्या २२ व रू. ५००/– दराच्या १२ भारतीय चलनी नोटा) पो.नि. नटे यांचे समक्ष सादर केल्या. त्यांनी सापळा पथकातील अंमलदारा मार्फत माझी अंगझडती घेतली व मी लाच म्हणून देण्याकरिता आणलेली रक्कम रू. ५०,०००/– वगळून अंगझडतीमध्ये मिळून आलेल्य इतर चीजवस्तू व रक्कम मला परत केली व ती पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवण्यास सांगितली.

दिनांक २४/०५/२०२१ रोजीचा फिर्यादी श्री. आनंद भिमराव माने यांचा जबाब पुढे चालु

त्यानंतर पो.नि. नटे यांनी मला व पंचांना लाचेकरिता दयावयाचे रक्कमेस व पाकीटास अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही आलेल्या पोलीस वाहनाचे चालक श्री. शिवथरे यांना बोलावून मला व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगून प्रात्यक्षिक दाखविण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी गाडीत असलेल्या पेटीतून एक डब्बा बाहेर काढून अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म मला पंचांसमक्ष समजावुन सांगितले. त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी लोकसेवक तिवारी यांनी स्वीकारून स्वत:कडे ठेवल्यास डोक्यावरून वारवार उजवा हात फिरवून इशारा करावा व तिवारी यांनी रक्कम स्वीकारून राठोड यांना दिल्यास माझ्या उजव्या हाताचा अंगठा वर करून लाच स्वीकारलेबाबतचा पोलीस पथकास दिसेल अशा पध्दतीने वारंवार इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले व सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेच्या आवश्यक त्या सुचना मला व पंच श्री. भायदे यांना दिल्या.

त्यानंतर पोलीस वाहनात वाहन चालक श्री. शिवथरे यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची रक्कम एका खाकी रंगाच्या कागदी पाकीटात भरून नमुद पाकीटास देखिल अँथ्रासीन पावडर लावली व सदरचे पाकीट माझे शर्टाचे वरील खिशामध्ये ठेवले. पो.नि. नटे यांनी यापुढील कारवाईत श्री. शिवथरे सहभागी असणार नाहीत असे मला व पंचांना सांगितले.

त्यानंतर पो.नि. नटे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पो.शि. सोनोने यांना माझे शर्टाच्या आतील बनियनला लावावयास सांगितले,नंतर मी व पंच श्री. भायदे यांचेसह सापळा कारवाईकरचीता लोकसेवक यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे) कार्यालय, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव, मुंबई येथे पाठविले.

माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून पायी चालत लोकसेवक राठोड यांचे कार्यालयापर्यत आले. मी लोकसेवक श्री नथु राठोड यांच्या केबीनजवळ उभे असलेले श्री. तिवारी यांना भेटलो. नमुद ठिकाणी जास्त गर्दी असल्याने श्री. तिवारी यांनी मला थोडा वेळ थांबण्यास सांगितले. काही वेळानंतर सदर कार्यालयात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे असल्याने श्री. तिवारी हे मला कार्यालयात असलेल्या शौचालया जवळ घेवून गेले. तेथे त्यांनी मला **" लाये पैसा ? "** असे विचारले असता मी पंन्नास हजार रूपये आणल्याबाबत त्यांना सांगितले. त्यावेळी **" पुरा पचास है ना? "** अशी विचारणा करून माझेसोबत आणलेले पैसे देण्यास सांगितले. त्यावेळी मी माझे शर्टाचे वरील खिशात असलेले पैशाचे पाकीट श्री. तिवारी यांचेकडे दिले. ते त्यांनी उजव्या हाताने स्वीकारून यांचे पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिशात ठेवले. नमुद वेळी मी सदरचे पैसे श्री. राठोड साहेबांना देंवून, मी माझे काम चालू सुरू शकतो का? याबाबत साहेबांचे कंन्फमेशन घेण्यास तिवारी यांना सांगितले तेव्हा श्री. तिवारी यांनी **" आपका काम कंन्फाम है।"** असे म्हणून श्री. तिवारी हे श्री. नथु राठोड यांचे केबिनकडे निघून गेले. त्यानंतर थोड्या वेळातच श्री. तिवारी हे पुन्हा माझे जवळ आले व मला श्री. नथु राठोड यांचे केबिनमध्ये घेवून गेले. नमुद वेळी श्री. तिवारी यांनी **" ये बत्तीस वाला "** असे म्हणून लोकसेवक श्री. राठोड यांचे कानामध्ये काहीतरी सांगितले व लोकसेवक श्री. राठोड यांनी **" हा ठीकये मग जा"** असे सांगितले त्यावेळी मी राठोड यांना अरजी देवू ना असे विचारले असता त्यांनी हा असे सांगितले. त्यानंतर मी राठोड यांचे केबिन बाहेर आलो व सापळा पथकास दिसेल अशा रितीने माझे उजव्या हाताचा अंगठा उभा करून पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीस पथकाने सी.ई.ओ. श्री. नथु राठोड यांचे केबिनमध्ये प्रवेश



समक्ष

(सुप्रिया ... नटे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

24-5-2021

दिनांक २४/०५/२०२१ रोजीचा फिर्यादी श्री. आनंद भिमराव माने यांचा जबाब पुढे चालु

करून लोकसेवक श्री. तिवारी यांना रू. ५०,०००/– लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले व सी.ई.ओ. श्री. नथु राठोड यांना ताब्यात घेतले. मला पो.शि. सोनोने यांनी एका बाजूस नेवून व्हॉईस रेकॉर्डर काढून तो पो.नि. नटे यांचेकडे दिला व त्यांनी तो बंद करून स्वतःकडे ठेवला व मला बाहेर थाबण्यास सांगितले.

त्यानंतर हात तपासण्याची व इतर प्राथमिक कारवाई नमुद कार्यालयात पूर्ण करण्यात आली. सदर कार्यालयात पुढील कारवाई करण्याकरिता आवश्यक जागा विद्युत पुरवठयासह उपलब्ध नसल्याने तसेच कारोना संसर्गजन्य आजारामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे जावून करण्यात येणार असल्याचे पो.नि.नटे यांनी सांगितले.

त्यानुसार मी, पंच, लोकसेवक राठोड व तिवारी यांचे सह लाचलुचपत कार्यालयात आलो व पुढील कारवाई करण्यात आली.

कार्यालयात आलेवर पोनि श्रीमती सुप्रिया नटे यांनी पंचांसमक्ष वर नमुद लोकसेवक यांना त्यांचे पुर्ण नाव व पदा बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांची नावे अनुक्रमे (१) श्री. नथु विठ्ठल राठोड वय ४४ वर्षे (सी.ई.ओ. (आरे) तथा उप आयुक्त, प्रशासन, अतिरिक्त कार्यभार वरळी दुग्ध डेअरी, मुंबई) (२) श्री. अरविंद त्रिभुवन तिवारी वय ५७ वर्षे ( शिपाई ), असे सांगितले.

मी माझे राहते घराची दुरूस्ती करण्याकरीता परवानगीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी (आरे) कार्यालय, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव, मुंबई यांचेकडे गेलो असता लोकसेवक श्री. अरविंद त्रिभुवन तिवारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नथु राठोड यांचेवतीने घर दुरूस्तीचे परवानगीकरीता रू. ५०,०००/– इतक्या रकमेची लाच मागून ती माझेकडून स्विकारली म्हणुन माझी नथु राठोड व अरविंद तिवारी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक श्री. अरविंद तिवारी व श्री. नथु राठोड यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली असता मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( सुप्रिया नटे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

24-5-2021

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे .............................................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.............................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य हस्तगत रू. ५०,०००/- रोख रक्कम (रू. २००० चे २२ व रू. ५०० चे १२ भारतीय चलनी नोटा)

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .............................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील बाकस नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील "फि" श्री माने यांनी त्यांचे आरे कॉलनी, युनिट क्र. ३२ येथील घराची दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेकरीता दि. १२/०५/२०२१ रोजी आलोसे क्र. १ यांची त्यांचे आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव पुर्व, मुंबई या कार्यालयात जावून भेट घेतली असता सदर कामाकरीता आलोसे क्र. १ यांनी त्यांचे कार्यालयातील आलोसे क्र. २ यांचेमार्फतीने रू. ५०,०००/- लाचेच्या रकमेची मागणी केली. सदरबाबत दि. १८/०५/२०२१ व दि. २४/०५/२०२१ रोजी पडताळणी करण्यात आली. दि. २४/०५/२०२१ च्या पडताळणी दरम्यान आलोसे क्र. २ यांनी फिर्यादीकडे रू. ५०,०००/- लाचेची मागणी आलोसे क्र. १ यांचेवतीने केल्याचे निष्पन्न झाले. त्याचा कारवाई दरम्यान आलोसे क्र. २ अरविंद तिवारी यांनी रू. ५०,०००/- लाच स्विकारून "फि" यांना आलोसे क्र. १ श्रीमती राठोड यांच्या समक्ष हजर करून त्यांनी सहमती दिली असता नमुद दोन्ही आरोपीना रंगेहात पकडण्यात आले

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अमलदाराचे नाव व हुद्दा : भ्र.प्र. अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

पो.नि. सुप्रिया नटे, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, .............................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...................., जिल्हा ...................., राज्य ....................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............... Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............................................. (3) Transferred to P. S. .............................................
District ............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name सुप्रिया नटे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई.
Posting
Code No. of I.O. ....................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**